16:23:06 **स.क्रि.केस नं. ७९४/२०२४**

हनुमान ग्रामीण बिगर शेती पतसंस्था वि. सुमितकुमार विश्वास डोंगरे

**निशाण नं.१५/क**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेतर्फे शपथेवर सुरु**

१७. माझे शिक्षण बी. ए पर्यंत झालेले आहे. माझे शिक्षण कला शाखेतून झालेले आहे. मी सन २०१७ पासून फिर्यादी संस्थेमध्ये नोकरीला आहे. मी फिर्यादी संस्थेमध्ये वसुली अधिकारी तसेच क्लार्क म्हणून नोकरी करत आहे. मी जेव्हा सदर संस्थेत नोकरीस लागलो तेव्हा मी क्लार्क म्हणून काम करत होतो, त्यानंतर मी वसुली अधिकारी म्हणून काम पाहू लागलो. नोकरीला लागल्यानंतर १ वर्षानंतर माझी वसुली अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. मी वसुली अधिकारी म्हणून नेमणुक झाल्याबाबतचा ठराव झालेला होता. आरोपी याने कोतोली शाखेकडे कर्ज मागणी केलेली होती.

१८. हे म्हणणे खरे आहे की, आमची बांबवडेमध्ये देखील एक शाखा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वसुली अधिकारी म्हणून काम करत असताना वसुली अधिकारी व्यतिरिक्त मी अन्य कोणतेही काम करत नाही. फिर्यादी संस्थेचे सदर न्यायालयात व पन्हाळा न्यायालय मुख्य न्यायाधीश यांचेकडे अंदाजे २०० कामे प्रलंबित आहेत. या सगळया कामांमध्ये वसुली अधिकारी म्हणून मी फिर्यादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कामांमध्ये फिर्यादी म्हणून आहे त्या कामांमध्ये माझी हजेरी घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की,या सगळया कामांमध्ये या न्यायालयात व पन्हाळा न्यायालय मुख्य न्यायाधीश यांचेकडे कामांमध्ये मी फिर्यादी या नात्याने संबंधित तारखांदिवशी नेहमी हजर असतो. आरोपी हा फिर्यादी संस्थेमध्ये अ वर्गाचा सभासद आहे.

१९.अ वर्गाचा सभासद असल्यामुळे कर्जाची रक्कम ही त्याचे उत्पन्न बघून ठरविले जाते. या कामात फिर्याद दाखल करण्याबाबत जो ठराव दिलेला आहे त्याची तारीख मला आठवत नाही. सदरचा ठराव हा कशाकरिता मला देण्यात आलेला आहे त्याचे कारण मला सांगता येईल. कोर्टामध्ये केसेस दाखल करणे, नोटिसा पाठविणे, कामकाज चालविणे, जाबजबाब देणे, शपथपत्रे दाखल करणे असे माझ्या कामाचे स्वरूप आहे. आरोपीचे कर्ज रक्कम अंदाजे रु.२,५०,०००/– होती. सदर कर्जाचा व्याज दर माझ्या माहितीनुसार १५ टक्के होता. मला जो ठराव दिलेला आहे तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला ठराव हा दि. २५.१२.२०२२ रोजीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठरावामध्ये कोणी चेक दिला तो वटला नाही त्याच्याबद्दल कोठेही नमूद नाही. सदर ठरावाबाबत आरोपी तर्फे वकील यांनी प्रश्न विचारल्यामुळे सदर ठरावास **नि. १६** देण्यात येत आहे. सदर कामी ज्या व्यक्तीने धनादेश दिला त्या व्यक्तीचे नाव नि. १६ ठरावामध्ये नाही.

२०.हे म्हणणे खरे नाही की, ज्याने धनादेश दिला त्याचे नावे धनादेश वटला नाही म्हणून त्याचे नावे नोटीस काढण्याचा अधिकार या ठरावामध्ये कोठेही दिलेला नाही. सदर ठरावामध्ये व्यक्तीचे नाव दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही, धनादेश न वटल्याबाबत मागणीची जी नोटीस पाठविण्याबाबतचे अधिकार मला देण्यात आलेले नाहीत. माझ्या माहितीनुसार सदर नोटीस पाठविण्याबाबतचे अधिकार ठरावामध्ये देण्यात आलेले आहेत. माझ्या माहितीनुसार सदर अधिकार हे परिच्छेद क्र. २ मध्ये देण्यात आलेले आहेत. सदर ठरावामध्ये "धनादेश न वटल्याबाबतची मागणीची नोटीस" असे शब्द नमूद नाहीत. फिर्याद दाखल करणेपूर्वी आम्ही आरोपीस संस्थेकडून नोटीस पाठवितो. आम्ही आरोपीस मागणी नोटीस सोडून थकीत कर्जाची नोटीस पाठवितो. या प्रकरणात सदर थकीत कर्जाची नोटीस हजर करण्यात आलेली नाही.

प्रश्न – नि. १६ अनु क्र. १ ला हजर केलेला ठराव आरोपीने दिलेल्या धनादेशाच्या वेळेस दिलेला ठराव तो नव्हे ?
उत्तर ठराव आधी झालेला आहे.

२१. हे म्हणणे खरे नाही की, सदर धनादेश भरतेवेळी मला नोटीस पाठविल्याचे, धनादेश भरण्याचे अधिकार देण्यात आलेले नव्हते. सदर धनादेश दि. ०५.०९.२०२४ रोजी देण्यात आलेला होता. सदरचा धनादेश या कामी हजर करण्यात आलेला आहे.

प्रश्न – आरोपीस मागणी नोटीस पाठविणे, फिर्याद दाखल करणे, धनादेश भरणे याकरिता नि. १६ व्यतिरिक्त आपणास फिर्यादी संस्थेने ठराव करून दिलेला आहे का ?
उत्तर नि. १६ वरील ठराव आहे.

२२. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५.०९.२०२४ रोजी भरलेल्या धनादेशाच्या अनुषंगाने नि. १६ वरील ठराव वगळता अन्य कोणताही ठराव अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०९.२०२४ रोजी दिलेल्या धनादेशाच्या अनुषंगाने मला फिर्यादी संस्थेने ठराव करून दिलेला नाही.

प्रश्न – या धनादेशाच्या अनुषंगाने तुम्हाला फिर्याद दाखल करणे, नोटीस पाठविणे, संस्थेच्या वतीने तडजोड करणे, जाबजबाब देणे, सरतपासाचे तसेच इतर अॅफिडेव्हीट करणे, अपील दाखल करणे, रिव्हीजन रिव्हयू करणे, वकीलपत्रावर सही करणे या अनुषंगाने या आरोपीविरुद्ध या धनादेशाबाबत २०२२ चा ठराव सोडून अन्य कोणता ठराव करून दिलेला आहे का ?

उत्तर – मी जो ठराव केलेला आहे तो सांगितला. असा अन्य कोणता ठराव करण्यात आलेला नाही.

२३. हे म्हणणे खरे आहे की, या आरोपीविरुद्ध सन २०२४ दरम्यान कोणताही ठराव झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो ठराव झालेला नसल्यामुळे फिर्याद दाखल करणे, नोटीस पाठविणे, संस्थेच्या वतीने तडजोड करणे, जाबजबाब देणे, सरतपासाचे तसेच इतर अॅफिडेव्हीट करणे, अपील दाखल करणे, रिव्हीजन रिव्हयू करणे, वकीलपत्रावर सही करणे हे अधिकार मला नाहीत. तसे कोणते अधिकारपत्र या कामात सन २०२४ चे पत्र या कामी मी दाखल केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात डिमान्ड नोटीस आमचे वकिल साहेबांनी पाठविलेली होती. डिमान्ड नोटीस अनुषंगाने माहिती मी दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या नोटिसीमध्ये माझे व्यतिरिक्त अन्य दोघांना अधिकार देण्यात आलेले आहेत. सदर नोटीस अनुषंगाने उलटतपासात प्रश्न विचारण्यात आल्यामुळे सदर नोटीसीस **नि. १७** देण्यात येत आहे. सदर नोटीसमध्ये जनरल मॅनेजर भिमराव महिपती फिरींगे, वडगाव शाखा मॅनेजर प्रशांत विठठल पाटील अशी नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ मीच या नोटिसातील मजकूराची माहिती माझ्या वकिलांना दिली असे नमूद नाही.

प्रश्न – तुम्ही मगाशी सांगितले की, या वकिलांना नोटिसीची तुम्ही दिली असे तुम्ही का सांगितले ?

उत्तर – सदर नोटीसची माहिती तिघांनी दिलेली आहे.

प्रश्न – तुम्ही मगाशी सांगितले की, या वकिलांना नोटिसीची तुम्ही दिली असे तुम्ही कारण सांगितले ?

उत्तर – माझ्याकडून थोडे नजरचुकीने नावे सांगायचे राहून गेले.

२४. मी उत्तर देण्या अगोदर नोटीस पाहिली होती. ती नोटीस मी पूर्ण वाचलेली आहे.

प्रश्न – सदर नोटीस तुम्ही वाचलेली होती, तरी देखील सदरनोटसीमधील अन्य नावे नजरचुकीने न येण्याबाबत या नोटीसीत चुकीचे नाही ?
उत्तर – माझ्या माहितीनुसार या नोटिसीत काही चुकीचे नमूद नाही.

२५.हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीचा धनादेश न वटल्याबत आम्ही तिघांनी वकिलांना माहिती सांगितली मात्र आजरोजी मी साक्षीला आल्यामुळे माझा रोल मी केवळ सांगितला. हे हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीची व्यक्तीशः माहिती नसताना मी त्याबाबत वकिलांना माहिती सांगितली व वकिलांनी त्या अनुषंगाने नोटीस पाठविली. हे म्हणणे खरे नाही की, मला संस्थेने कोणत्या तारखेला ठराव दिला, तो कशाकरिता दिला व तो कोणत्या व्यक्तीकरिता दिला असा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. १७ वरील नोटीसमध्ये सदर ठराव कोणत्या तारखेला दिला, तो कशाकरिता दिला व तो कोणत्या व्यक्तीकरिता दिला हे नमूद नाही. सदर मजकूर नमूद नाही याबाबत मी माझ्या वकिलांना विचारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपी विरुद्ध सदरची नोटीस पाठविताना आमच्या संस्थेने आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करणे, नोटीस पाठविणे, जाबजबाब देणे, अॅफिडेव्हीट दाखल करणे या कारणांकरिता मी व अन्य दोघांना अधिकार देण्यात आलेले नव्हते.

प्रश्न – सदर झालेला ठराव हा कोणत्या तारखेला झाला व कोणत्या क्रमांकाने झाले ते मला सांगता येईल ?

उत्तर – माझ्या माहितीनुसार सदरचा ठरावा हा नि. १६ येथे आहे.

२६.मला आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करतेवळी त्याबाबत फिर्याद दाखल करायच्या आधी सन २०२३ व २०२४ मध्ये कोणताही ठराव  पारीत करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करण्याचे अधिकार देण्याचा ठराव करण्यात आलेला नाही.

प्रश्न – फिर्याद दाखल करतेवेळी आरोपी विरुद्ध ठराव कोणत्या तारखेला व कोणत्या क्रमांकाने पारीत करण्यात आलेला होता ?
उत्तर – आम्ही कामामध्ये एकच ठराव दाखल केलेला आहे.

२७.हे म्हणणे खरे आहे की, दि. २५.१२.२०२२ रोजी जो ठराव झाला त्याच्यानंतर त्या व्यतिरिक्त या आरोपीविरुद्ध कोणताही ठराव पारीत झालेला नाही.  हे म्हणणे खरे आहे की, संस्थेला जर एखाद्या व्यक्तीविरुद्ध ठराव नसेल तर कार्यवाही करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या आरोपीविरुद्ध आमच्या संस्थेने सन २०२२ नंतर मला कोणतीही कार्यवाही करण्याचा ठराव दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा ठराव नसल्यामुळे मला या आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करण्याचे तसेच नोटीस पाठविण्याचे कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत. आमच्या संस्थेत कर्ज मागणी, कर्ज मंजूरी असे वेगवेगळे विभाग नाहीत. कर्ज मंजूरी साठी अर्ज द्यायचा असेल तर तो पहिल्यांदा मॅनेजर यांच्याकडे दिला जातो. त्यानंतर सदर अर्ज संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये ठेवला जातो. हे म्हणणे खरे नाही की, सदर मंजूरीबाबतचा अर्ज माझ्याकडे येत नाही. ज्या दिवशी संचालक मिटींगमधून अर्ज बाहेर येतो त्या दिवशी मला तो प्राप्त होतो. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मंजूरीकरिता कोणामार्फत व कोणत्या व्यक्तीने दिले याची मला व्यक्तीशः माहिती नसते.

प्रश्न – अर्ज देण्यापासून मंजूरीपर्यंत व मंजूर झाल्यापासून माझेकडे येण्यापर्यंत ही दोन वेगवेगळी वाक्य आहेत का ?

उत्तर माझ्यामते दोन्ही वाक्य एकच आहेत.

२८.हे म्हणणे खरे आहे की, मंजूरी अर्ज संचालक मंडळापुढे ठेवला जातो व तो मंजूर झालेनंतर आमचेकडे पाठविला जातो अशी साधारण पद्धत आहे. सदर कर्ज मंजूरी अर्जावरील हस्ताक्षर कोणाचे असते याची माहिती मला असते. कर्ज मागणी अर्ज हा भरतेवेळी कर्जदार हा आमच्या क्लार्क माहिती सांगतो व क्लार्क ती माहिती भरतो. सदर अर्जावर कर्जदार यांची सही असते. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीने माझ्या समोर किंवा फिर्यादी संस्थेमध्ये कर्ज अर्ज दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीने कर्ज मागणीचा अर्ज माझ्या समक्ष कधीही न दिल्यामुळे त्याच्यावरील हस्ताक्षर कोणाचे आहे याबाबत मला माहिती नाही. आमच्या संस्थेच्या तीन शाखा म्हणजे कोतोली, बांबवडे व कळे होय. कर्ज मागणीचा अर्ज हा प्रस्तुत प्रकरणात बांबवडे शाखेने दिलेला होता. सदर आरोपीने कर्ज मागणीचा अर्ज हा अंदाजे सन २०२१ मध्ये दिलेला होता.

२९. फिर्यादी संस्थेमध्ये मी नेहमी कोतोली शाखा मुख्य ब्रांन्च येथे हजर असतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपीचा कर्ज अर्ज कोणी दिला, कोणी भरला, त्याच्यावरील हस्ताक्षर कोणाचे याबाबतची मी कोतोली शाखेत असल्यामुळे व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व्यतिरिक्त आमच्या संस्थेत अन्य वसुली अधिकारी नाही. या आरोपीकडे मी कधी वसुली करण्याकरिता गेलो होतो त्याची तारीख मला आठवते. मी दि. ०५.०९.२०२४ रोजी सदर आरोपीकडे वसुलीकरिता गेलो होतो. मी सदर आरोपीकडे बांबवडे येथील ग्रामपंचायत जवळ असलेल्या आरोपीच्या घरी गेलो होतो. मी त्या दिवशी रक्कम रु. १, ८०, ०००/– च्या वसुलीकरिता गेलो होतो.

३०. हे म्हणणे खरे नाही की,  जी रक्कम थकीत गेली त्याच्याबद्दल नोटिसीत, फिर्याद व सरतपासात कोठेही नमूद नाही. वसुलीला गेलो त्या वेळी किती रक्कम थकीत होती याबाबतचा मजकूर नोटिसीमध्ये नमूद आहे. सदर आरोपीची थकीत रक्कम दि. ०५.०९.२०२४ रोजी १, ८०, ०००/– एवढी होती. माझ्या माहितीनुसार दि. ०५.०९.२०२४ रोजी सदर आरोपी हा रक्कम रु. २,१८, ०००/– एवढया रक्कमेकरिता थकीत होता. सदर रक्कम रु. २, १८,०००/– ही नोटीस व फिर्यादमध्ये नमूद करायला अडचण नव्हती.सदर रक्कमेची नमूद करायची आवश्यकता वाटली नाही म्हणून ती नोटीस व फिर्याद मध्ये लिहीली नाही. मी फिर्याद, नोटीस व माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वाचून पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जी रक्कम वसुलीसाठी गेलो त्याच्या अंशतः फेडीसाठी जो चेक दिला  आहे तो रक्कम रु. १, ८०, ०००/– चा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये "अंशतः परतफेडीपोटी” असे शब्द नमूद आहेत.

प्रश्न – जर आपल्या कथनानुसार धनादेश हा पुर्ण रक्कमेकरिता दिला होता तर सदर सरतपासात अंशतः परतफेडीपोटी असे शब्द का नमूद आहेत ?

उत्तर – मी ज्यावेळी वसुलीला गेलो त्यावेळी आरोपीच्या सर्व रक्कमेबाबत माझे आरोपीशी बोलणे झालेले होते. आरोपीने मला रक्कम रु. १, ८०, ०००/– चा धनादेश रक्कम परतफेडीपोटी दिला.

३१.हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याच्या रक्कम रु. १, ८०, ०००/– च्या रक्कमेव्यतिरिक्त अन्य रक्कम थकीत नाही. माझ्या माहितीनुसार आरोपीचे टोटल कर्ज २, ५०, ०००/– होते.

प्रश्न – आरोपी हा जर २, ५०, ०००/– रकमेकरिता दि. ०५.०९.२०२४ रोजी थकीत होता तर ती रक्कम नमूद करायला नोटीस, फिर्याद व सरतपासचे प्रतिज्ञापत्र यामध्ये नमूद करायला तुम्हाला अडचण नव्हती ?
उत्तर – सदर ठिकाणी नजरचुकीने राहून गेलेले आहे.

(फिर्यादी तर्फे वकील श्री. बी. बी. शेलार यांनी सदर प्रश्नाच्या अनुषंगाने तीव्र आक्षेप नोंदविला व त्यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात तसेच फिर्याद व नोटीसमध्ये पुर्ण खाते थकीत गेलेले आहे असे नमूद केलेले आहे त्यामुळे सदरचा प्रश्न विचारता येणार नाही. आरोपी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मी मुळात पुर्ण रक्कम विचारलेली आहे. त्यामुळे प्रश्न विचारण्याचा मला अधिकार आहे. दोन्ही वकिलांच्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकनक केले असता, मुळातच भारतीय पुरावा कायद्यानुसार सदरचा प्रश्न हा Relevant आहे असे वाटते सबब हरकत फेटाळण्यात येत आहे.)

३२.या प्रकरणात खाते उतारा मी हजर केलेला आहे.

प्रश्न – दि. ०५.०९.२०२४ रोजी आरोपी याचे कर्ज रक्कम रु. २, ५०, ०००/– थकीत असल्याबाबतची खाते उताऱ्यामध्ये नोंद नाही ?
उत्तर –हे म्हणणे खरे आहे.

३३.सदर खाते उताऱ्याच्या अनुषंगाने आरोपी तर्फे वकील यांनी प्रश्न विचारल्यामुळे सदर खाते उताऱ्यास **नि. १८** देण्यात येत आहे. मी दाखल केलेला खाते उतारा खरा व बरोबर

आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खाते उतारा खरा व बरोबर असल्याबाबत मी शपथपत्रात नमूद केलेले आहे.

प्रश्न – दि. ०५.०९.२०२४ रोजीची जी एंन्ट्री या खाते उताऱ्यात नमूद नाही ?
उत्तर हे म्हणणे खरे आहे.

३४.हे म्हणणे खरे नाही की, सदरची एंन्ट्री नसल्याबाबत मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे म्हणून मी खोटे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे असे म्हणता येणार नाही.

प्रश्न – सदर दि. ०५.०९.२०२४ रोजीची रक्कम सरतपासात लिहायला अडचण होती का ?
उत्तर – बरोबर आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अडचण नव्हती.

३५.अडचण काय ते मला सांगता येणार नाही.

प्रश्न – आरोपी याची दि. ०५.०९.२०२४ ची रक्कम थकीत असल्याबाबतची सदर खाते उताऱ्यात कोणतीही नोंद नाही ?
उत्तर –खाते उताऱ्यात त्या दिवशीची नोंद नाही.

३६. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५.०९.२०२४ रोजी या आरोपीची थकीत रक्कम रु. २, ५०, ०००/– असल्याबाबत सदर खातेउताऱ्यात नोंद नाही. माझ्या माहितीनुसार खाते उताऱ्यात रक्कम रु. २, ५०, ०००/– ची नोंद आहे.

(फिर्यादी तर्फे वकील यांनी सदर प्रश्न व उत्तर यांच्या अनुषंगाने आक्षेप नोंदवून असा युक्तीवाद केला, सदर प्रश्न विचारता येणारा नाही कारण फिर्यादीला मुळात कायद्यानुसार Legally Inforceable debt दाखवावी लागते त्या अनुषंगाने आरोपी यांचा कोणताही प्रश्न नाही त्यामुळे सदरचा प्रश्न हा प्रकरणाशी Relevant नाही. तसेच आरोपीचे पुर्ण खाते थकीत गेलेले होते. आरोपी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच कायद्यानुसार कलम ११८ व कलम १३९ हे स्पष्ट आहे. त्यामध्ये फिर्यादीने कोणतीही येणे रक्कम नमूद केलेली नाही. दोन्ही वकिलांच्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकलन केले असता, सदर आक्षेपाच्या अनुषंगाने निर्णय हा अंतिम युक्तीवादाच्या वेळी घेण्यात येईल.)

**उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब**

18:00:39

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. १८.०२.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा